# आंतरराष्ट्रीय सहनिर्मितीतील आसामी चित्रपट ‘मर्डर्स टू क्लोज - लव्ह टू फार’ ‘पिफ’मध्ये प्रदर्शित

पुणे, दि . १७ जानेवारी २०२६ : आसामी आणि इस्रायली आंतरराष्ट्रीय सहनिर्मितीचा ‘मर्डर्स टू क्लोज - लव्ह टू फार’ या चित्रपटाचे प्रदर्शन आज पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) ‘ग्लोबल सिनेमा’ विभागात कलाकारांच्या उपस्थितीत झाले.

आसामच्या दिग्दर्शिका मंजू बोरा आणि इस्रायलचे दिग्दर्शक डॅन वोलमन यांनी एकत्रितपणे दिग्दर्शित केलेला भारत -इस्रायल सहनिर्मितीचा ‘मर्डर्स टू क्लोज - लव्ह टू फार’ या चित्रपटाचे प्रदर्शन आज झाले. सत्ता आणि स्त्रिया यांच्या संघर्षाची कहाणी या चित्रपटात मांडण्यात आली आहे. यामध्ये सिद्धार्थ गोस्वामी, शमिन मनन, सीमा बिस्वास, भागीरथी बाई कदम आणि आदिल हुसेन यांनी भूमिका केल्या आहेत.

दिग्दर्शिका मंजू बोरा म्हणाल्या, "पिफमध्ये निवड होणे हा आमच्यासाठीच नव्हे तर संपूर्ण आसामी सिनेमासाठी अभिमानाची बाब आहे." त्यांनी पटकथेचे श्रेय सहदिग्दर्शक डॅन वोलमन यांना देताना सांगितले, "डॅन वोलमन यांची कल्पकता असाधारण आहे. चित्रपटनिर्मितीत त्यांची मदत फार मौल्यवान ठरली."

सहदिग्दर्शक डॅन वोलमन यांनी भारतातील अनुभवाबद्दल सांगितले, "वीस वर्षे मी भारतात येत आहे. लखनौ, मुंबई, कोलकाता, कोल्हापूर येथे मी काम केले आहे. आफ्रिका, अमेरिका, युरोप खंडातही काम केले, परंतु भारतात काम करताना विशेष आनंद झाला."

**‘डिअर माँ’ : रक्तापलीकडची आई**

बंगाली चित्रपट डिअर माँ हा कुटुंबासोबत बसून पाहता येईल असा हा चित्रपट असून, प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो. असे दिग्दर्शक अनिरुध्द रॉय चौधरी यांनी सांगितले.
दत्तक मूल आणि आई यांच्यातील नात्यावर आधारित ‘डिअर माँ’ हा चित्रपट आज ‘पिफ’madhye प्रदर्शित करण्यात आला त्यांनतर अनिरुध्द रॉय चौधरी बोलत होते.
ते म्हणाले, “समाज अनेकदा नात्यांना न्याय- अन्याय, बरोबर-चूक अशा चौकटीत माणसांना अडकवतो. पण नात्यांची किंमत निर्णयांवर नाही, तर बांधिलकीवर ठरत असते. आयुष्यातील गुंतागुंत, परिस्थितीची मर्यादा आणि समाजाचा दबाव आणि मातृत्वाची तडजोड या चित्रपटात आहे. काहीच चुकीचं नाही, काहीच पूर्णपणे बरोबर नाही जीवन हे अशाच मधल्या रेषांवर जात असत, हे दाखवण्याचा हा प्रयत्न आहे.”

**‘मेइयळगन’ : एक संवेदनशील कादंबरी**

‘मेइयळगन’, हा सी. प्रेमकुमार यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट आज ‘पीएफ‘मध्ये प्रदर्शित करण्यात आला. ‘मेइयळगन’ ही तंजावरच्या पार्श्वभूमीवर उलगडणारी कथा बालपण, कुटुंब, तुटलेले संबंध आणि न बदलणाऱ्या आठवणींचे हळुवार स्मरण करून देते. हा चित्रपट केवळ चित्रपट म्हणून न पाहता, माणसाच्या आयुष्यातील वेगवेगळ्या नातेसंबंधांना, निसर्गाशी असलेल्या जवळीकीला, प्राणी आणि अगदी अनोळखी व्यक्तींशी जोडल्या जाणाऱ्या भावनिक धाग्यांना गुंफणारी एक संवेदनशील कादंबरी असल्यासारखा वाटतो.

दिग्दर्शक सी. प्रेमकुमार म्हणाले, “थ्रिलर, विनोद किंवा झगमगत्या मनोरंजनाच्या चौकटीबाहेर जाऊन माणसाला स्थिर व्हायला आणि जगण्याचा अर्थ समजावून सांगणारा चित्रपट तयार करायचा होता त्यातून या चित्रपटाची निर्मिती झाली. यात नॉस्टॅल्जिया म्हणजे केवळ भूतकाळाची आठवण नसून, बालपणाशी, मुळांशी आणि हरवलेल्या नात्यांशी असलेले नाते आहे.
यावेळी दिग्दर्शक सी. प्रेमकुमार यांनी आपल्या प्रवासाबद्दल सांगताना लेखक, छायाचित्रकार ते दिग्दर्शक असा स्वतःचा प्रवास उलगडून सांगितला.